## इतिवृत्त

**मे. बापुना स्पिरिट्स प्रा. लिमिटेड, गट नं. २६,२७,२९, ३१, ३२ (अंशतः), ३४ (अंशतः), ३५ (अंशतः), गाव. पिंपळखेड, ता. दिंडोरी, जि. नाशिक-४२२ २०२ यांचा माल्ट आधारीत प्रस्तावित ४० किलो लिटर प्रती दिन स्पिरीट उत्पादन व महुवा आधारीत २ किलो लिटर प्रती दिन स्पिरीट उत्पादन प्रकल्प उभारणीच्या बाबत दिनांक १४/११/२०२५ रोजी दुपारी ११:३० वाजता मे. बापुना स्पिरिट्स प्रा. लिमिटेड, गट नं. २६,२७,२९, ३१, ३२ (अंशतः), ३४ (अंशतः), ३५ (अंशतः), गाव. पिंपळखेड, ता. दिंडोरी, जि. नाशिक-४२२ २०२ येथे घेण्यात आलेल्या पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणीचे इतिवृत्त**

---

मे. बापुना स्पिरिट्स प्रा. लिमिटेड, गट नं. २६,२७,२९, ३१, ३२ (अंशतः), ३४ (अंशतः), ३५ (अंशतः), गाव. पिंपळखेड, ता. दिंडोरी, जि. नाशिक-४२२ २०२ यांचा माल्ट आधारीत प्रस्तावित ४० किलो लिटर प्रती दिन स्पिरीट उत्पादन व महुवा आधारीत २ किलो लिटर प्रती दिन स्पिरीट उत्पादन प्रकल्प उभारणीच्या बाबत दिनांक १४/११/२०२५ रोजी दुपारी ११:३० वाजता मे. बापुना स्पिरिट्स प्रा. लिमिटेड, गट नं. २६,२७,२९, ३१, ३२ (अंशतः), ३४ (अंशतः), ३५ (अंशतः), गाव. पिंपळखेड, ता. दिंडोरी, जि. नाशिक-४२२ २०२ येथे घेण्यात पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी घेण्यात आली होती.

मा. सह संचालक (ज. प्र. नि), महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई-७६ / २०२५ पत्र क्रं. बी.ओ./जे.डी.(डब्ल्यूपीसी)/पीएच/बी - २५१०३१ – एफटीएस - ००४२ दि. ३१/१०/२०२५ अन्वये, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती गठीत करण्यात येऊन खालीलप्रमाणे समितीचे सदस्य सदर लोकसुनावणीस उपस्थित होते.

१. **श्री. नरेश अकुनुरी (भा.प्र.से.),** : अध्यक्ष
उपविभागीय दंडाधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी कळवण,
उपविभाग कळवण.

२. **श्री. लिंबाजी भड,** : सदस्य
प्रादेशिक अधिकारी,
म.प्र.नि. मंडळ, नाशिक.

३. **श्री. प्रशांत गायकवाड,** : आयोजक
उप प्रादेशिक अधिकारी,
मप्रनि मंडळ, नाशिक.

श्री. प्रशांत गायकवाड, उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, नाशिक यांनी सर्वप्रथम उपस्थितांचे स्वागत करुन पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समितीचे अध्यक्ष यांच्या परवानगीने सदर जाहीर लोकसुनावणीची कार्यवाही सुरु केली. त्यांनी सांगितले की, आज आपण महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण

मंडळातर्फे मे. बापुना स्पिरिट्स प्रा. लिमिटेड, गट नं. २६,२७,२९, ३१, ३२ (अंशतः), ३४ (अंशतः), ३५ (अंशतः), गाव. पिंपळखेड, ता. दिंडोरी, जि. नाशिक-४२२ २०२ यांचा माल्ट आधारीत प्रस्तावित ४० किलो लिटर प्रती दिन स्पिरीट उत्पादन व महुवा आधारीत २ किलो लिटर प्रती दिन स्पिरीट उत्पादन प्रकल्प उभारणीच्या अनुषंगाने पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणीसाठी उपस्थित आहोत. सदर प्रकल्प हा पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकारचे अधिनियम दिनांक १४ सप्टेंबर, २००६ च्या अधिसूचनेनुसार 'बी' वर्गात मोडतो. ज्यास भारत सरकार, नवी दिल्ली यांची पर्यावरण विषयक मंजुरी घ्यावी लागते, त्याचाच एक भाग म्हणून सदर प्रकल्पासाठी जाहीर लोक सूनावणी घेणे आवश्यक आहे. मे. बापुना स्पिरिट्स प्रा. लिमिटेड यांचा पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी घेण्यासाठी म.प्र.नि. मंडळाकडे अर्ज दि. १०/०९/२०२५ रोजी प्राप्त झाला. त्याअनूषंगाने मा. जिल्हाधिकारी नाशिक यांच्या परवानगीने आजची लोकसूनावणी दिं. १४/११/२०२५ वेळ-दूपारी ११.३० वा. निश्चित करण्यात आली. पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी बाबत नियमानूसार ३० दिवस अगोदर दिं. ०७/१०/२०२५ रोजी दैनिक सकाळ व दैनिक टाईम्स ऑफ इंडिया या वृत्तपत्रामध्ये जाहीर सूचना प्रसिध्द करण्यात आली. तसेच जिल्हयातील संबंधित शासकीय कार्यालये व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संकेतस्थळावर सदरच्या प्रकल्पाची माहिती पुस्तिका नागरिकांच्या अभ्यास व अवलोकनाकरीता ठेवण्यात आलेल्या होत्या, त्याची यादी खालीलप्रमाणे-

१. मा. संचालक, पर्यावरण विभाग, नवीन प्रशासन भवन, १५वा मजला, मादाम कामा रोड, मंत्रालय, मुंबई -२४
२. मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक
३. सह संचालक (ज.प्र.नि.) मप्रनि मंडळ, कल्पतरु पाइंट इमारत, ३रा मजला, सायन माटुंगा स्कीम रोड नं.०८, सायन सर्कल सायन (पु)
४. मुख्याधिकारी, जिल्हा परिषद कार्यालय, नाशिक
५. प्रादेशिक अधिकारी, प्रादेशिक कार्यालय, मप्रनि मंडळ, उदयोग भवन, पहिला मजला, त्रंबकरोड, आयटीआय जवळ, सातपूर, नाशिक - ४२२००७
६) उप-विभागिय अधिकारी कार्यालय, ता. दिंडोरी, जि. नाशिक.
७) तहसिल कार्यालय दिंडोरी, जि. नाशिक.
८) ग्रामपंचायत कार्यालय, पिंपरखेड, दहिवी, खेडले, कोशिंबे ता. दिंडोरी जि. नाशिक. इ.

तसेच त्यांनी नमुद केले की, याबाबत काही सूचना/आक्षेप असल्यास याबाबत कळवण्यासाठी ३० दिवसाची मूदत देण्यात आलेली होती त्या अनुषंगाने उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि. मंडळ, नाशिक येथे कोणतीही सूचना प्राप्त झालेली नाही आहे. तरी उपस्थित नागरिकांमंधून कोणास कांही लेखी/तोंडी आक्षेप/टिका/टिप्पणी नोंदवायचे असतील तर ते सदर प्रकल्पाचे सादरीकरण झाल्यानंतर नोंदवू शकतात. तदनंतर त्यांनी मा. अध्यक्ष यांच्या परवानगीने सदर प्रकल्प प्रवर्तकांना प्रस्तावित प्रकल्पाविषयीचे सादरीकरण करण्याविषयी विनंती केली.

प्रकल्प सल्लागार, मे. मिटकॉन कन्सल्टन्सी अँड इंजिनीयरिंग सर्विसेस लि., पुणे यांनी प्रकल्पाबद्दल विविध मुदयांवर सादरीकरण केले जसे की,- प्रस्तावना, पर्यावरण प्रभाव मुल्यांकन आणि जाहीर जनसुनावणीचे प्रयोजन, प्रकल्पाचे स्थळ, प्रकल्पाचे गुगल नकाशा, प्रकल्पाचा तपशिल, प्रकल्पाचा आराखडा, प्रकल्पाचे अध्ययन क्षेत्र, प्रकल्प स्थळाची सध्याची छायाचित्रे, प्रस्तावित प्रकल्पाची प्रमुख वैशिष्टये, प्रस्तावित प्रकल्पाची मुलभूत आवश्यकता, पर्यावरण सदयस्थितीचा अभ्यास, स्थानीक पर्यावरणाचा तपशील व परिसराची माहिती, अभ्यास स्थळाची माहिती, अध्ययन क्षेत्रातील वायूची गुणवत्ता तपासणी, वायू गुणवत्तेचा निष्कर्ष, अध्ययन क्षेत्रातील ध्वनीची तीव्रता तपासणी, ध्वनी गुणवत्तेचा निष्कर्ष, अध्ययन क्षेत्रातील पाणी गुणवत्ता तपासणी, भुतलावरील पाणी गुणवत्तेचा निष्कर्ष, भुजल पाणी गुणवत्तेचा निष्कर्ष, अध्ययन क्षेत्रातील मातीची गुणवत्ता तपासणी, माती गुणवत्तेचा निष्कर्ष, जैव पर्यावरण, अध्ययन क्षेत्रातील जमिनीचे वर्गीकरण, सामाजिक आर्थीक पर्यावरण, सभोवतालच्या पर्यावरणावर होणारे अपेक्षित परिणाम, सामाजिक आर्थीक पर्यावरण, पर्यावरण व्यवस्थापन आराखडा, पाणी आणि सांडपाणी व्यवस्थापन, घनकचरा व्यवस्थापन, हरितपटटा विकास व त्याचे छायाचित्रे, व्यावसायिक निरीक्षण कार्यक्रम तपशील, पर्यावरण व्यवस्थापन कक्ष माहिती, सामाजिक बांधिलकी, सामाजिक आर्थीक पर्यावरण, सभोवतालच्या पर्यावरणावर होणारे अपेक्षित परिणाम, पर्यावरण व्यवस्थापन आराखडा, विविध पर्यावरण विषयक परिणामांच्या उपाय योजना, पर्यावरण जबाबदारी योजने अंतर्गत सामाजिक-आर्थीक कल्याण उपक्रम, पर्यावरण व्यवस्थापन खर्चाची तरतूद, प्रकल्पाचे फायदे इत्यादी. सदर माहिती सीडीमध्ये रेकॉर्डीग करण्यात आली असून संक्षिप्तमध्ये इतिवृत्तात नोंद करण्यात आली आहे.

प्रकल्प सल्लागारांनी सदर प्रकल्पाचे पॉवर पॉईट सादरीकरण समाप्त केल्यानंतर श्री. प्रशांत गायकवाड, यांनी उपस्थित नागरिकांना विनंती केली की, सदर प्रकल्पासंबंधी जर कुणाला काही प्रश्न, सुचना, टिप्पणी, विचार इ. मांडायचे असतील तर ते त्यांनी त्यांचे नांव व गावाचे नांव सांगून विचारावेत.

जाहीर लोकसूनावणी दरम्यान उपस्थित नागरिकांनाी सदर प्रकल्पा संबधी काही प्रश्न उपस्थित केले त्याबाबतची प्रकल्प प्रतिनिधी/ सल्लागार कडून उत्तर देण्यात आले ते खालीलप्रमाणे आहे.

| **अ.क्रं.** | **केलेले टिका टिप्पणी, आक्षेप, सुचना मुददा इत्यादी व उपस्थित व्यक्तिचे नांव.** | **उदयोगाच्या प्रतिनिधीने/ प्रकल्प सल्लागार यांनी दिलेले आश्वासन / उत्तर.** |
|---|---|---|
| १. | श्री. रामदास गडोली, पिंपळखेड - आमचं गाव आदिवासी वस्ती जास्त असल्यामुळं आमच्याकडे खूप असे रोजगार नाही स्थानिक लोकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून प्राधान्य देण्यात यावे. | प्रकल्प प्रवर्तक- स्थानिक लोकांनाच रोजगाराच्या प्राधान्य दिले जाईल. कुशल अकुशलते प्रमाणे स्थानिकांना रोजगारामध्ये प्राधान्य दिलं जाईल. |

| | | |
|---|---|---|
| २. | उपविभागीय दंडाधिकारी तथा पविभागीय अधिकारी कळवण, उपविभाग कळवण - प्रकल्पाच्या अनुषंगाने आपणास लागणारे कुशल व अकुशल कामगारांचा आपण जवळील परीसरात सर्वे केला आहे का | प्रकल्प प्रवर्तक- सोशल इकोनॉमिक इन्वायरमेंट सर्वे केलेला आहे. तसेच आपल्या कंपनीच्या सी.एस.आर. फंड च्या माध्यमातून स्कील डेव्हलपमेंट प्रोग्राम घेऊन लोकांना प्रशिक्षण देणार आहोत आणि त्यांना प्राधान्य देऊ. |
| ३. | श्री. बबन हरिभाऊ पवार, पिंपरखेड<br>१. प्रस्तावित प्रकल्पाला पाठिंबा दर्शविला आणि कोणत्याही चिंतांबद्दल भविष्यात संवाद साधण्यासाठी अधिकृत किंवा जबाबदार व्यक्तीचा संपर्क क्रमांक उद्योगाच्या प्रवेशद्वारावर नमुद करण्यात यावे.<br><br>२. उद्योगाने स्थानिक लोकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यास प्राधान्य द्यावे. या संदर्भात, कारखान्यात कोणत्याही रोजगारासाठी किंवा भरतीसाठी ग्रामपंचायतीला सूचना द्यावी. याव्यतिरिक्त, जर स्थानिक पातळीवर कुशल मनुष्यबळ उपलब्ध नसेल, तर कंपनीने बाहेरून कामगार घेण्याचा विचार करावा.<br><br>३. त्यांनी असेही जोर दिला की कंत्राटी पद्धतीने कामगारांना कामावर ठेवताना, उद्योगाने त्यांना योग्य वेतन मिळेल याची खात्री करावी, कारण असे आढळून आले आहे की कंत्राटदार कधीकधी कामगारांच्या वेतनाचा काही भाग रोखून ठेवतात. अशा पद्धती घडू नयेत.<br><br>४. त्यांनी पुढे सांगितले की कंपनीने गावातील एक प्रमुख संपर्क व्यक्ती नियुक्त करावी ज्यावर गावकरी विश्वास ठेवतील आणि स्पष्टपणे समजतील जेणेकरून भविष्यात कोणताही संवाद | प्रकल्प प्रस्तावकाने सूचना स्वीकारल्या आणि उद्योग व्यवस्थापन कक्षा स्थानिक समुदायाच्या उद्योगाशी संबंधित कोणत्याही समस्यांचे निराकरण करण्यासाठी आणि आवश्यक सहकार्य प्रदान करण्यासाठी नेहमीच उपलब्ध राहील असे आश्वासन दिले.<br><br>त्यांनी पुढे सांगितले की स्थानिक लोकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे हे उद्योगाचे उद्दिष्ट आहे.<br><br>कंत्राटी कामगार देयकाबद्दल प्रकल्प प्रस्तावकाने माहिती दिली की प्रकल्प प्रस्तावकाने स्पष्ट केले की सर्व कामगार वेतन देयके थेट बँक खात्यांद्वारे केली जातात, जेणेकरून कंत्राटदारांकडून अशा कोणत्याही समस्या किंवा हस्तक्षेप होणार नाही याची खात्री केली जाईल.<br><br>प्रमुख व्यक्तीच्या नियुक्तीबद्दल, प्रकल्प प्रस्तावकाने या सूचनेचे स्वागत केले. लेखी स्वरूपात अशी माहिती देण्याबाबत, असे स्पष्ट करण्यात आले की अशी कोणतीही नियुक्ती किंवा सहभाग सीईआर उपक्रमांच्या अंमलबजावणीद्वारे केला जाईल. कारखान्याने आधीच |

| | | |
|---|---|---|
| | किंवा तक्रारी अधिक सहजपणे सोडवता येतील. त्यांनी असेही सुचवले की कारखान्याने ही माहिती लेखी स्वरूपात द्यावी. | सांगितले आहे की हे उपक्रम ग्रामपंचायतीशी समन्वय साधून केले जातील. |
| ४. | गणेश मुरलीधर जोशी रा. पिंपरखेड- आमचा जो शेतीमाल आहे तो कॉन्ट्रॅक्ट बेसवर घेतला नाही पाहिजे. शेतकऱ्यांचा माल कंपनीने घेतला पाहिजे. | प्रकल्पाच्या प्रस्तावकांनी हे सुनिश्चित करण्यास सहमती दर्शविली की, ऑपरेशनल टप्प्यात, उद्योगाला कच्चा माल आवश्यक दर्जाच्या मानकांची पूर्तता करेल, तर उपलब्धतेच्या अधीन राहून तो थेट शेतकऱ्यांकडून मिळवला जाईल. त्यामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेला आधार मिळेल. |
| ५. | सचिन हरिशचंद्र सातभाई रा. दहिवी -<br>१. भूसंपादीत शेतकरी आहेत त्या शेतकरी कुटुंबातील किमान एक किंवा दोन घरातील त्या व्यक्तींना तुम्ही योग्य असं प्रशिक्षण देऊन या तुमच्या प्रकल्पांमध्ये नोकरी द्या.<br>२. शेतीला जर नुकसान होत असेल भविष्यात तर कंपनीच्या माध्यमातून क्रॉप कव्हर ची येऊन उपलब्धता करून द्यावी अशी मी तुम्हाला या विनंती करतो. | प्रकल्प प्रवर्तक- पर्यावरण मंत्रालयाने एक निकष वायुप्रदूषणबाबत ठरवलेला आहे त्याची काटेकोर पणे आम्ही पालण करू. तसेच इलेक्ट्रोस्टैटिक प्रेसिपिटेटर (ESP) ज्यात ९९.९९(ESP) हि नवीन यंत्रणा बसवणार आहोत व स्थानिक रोजगारासाठी स्कील डेव्हलपमेंट मार्फत घेऊ. |
| ६. | दिगंबर धात्रक, पिंपरखेड- प्रकल्पाचे काम सुरू झाल्यास कुंपण आत घ्यावे हि विनंती. | प्रकल्प प्रवर्तक- सदर रस्त्यांची रूंदी असणे प्रकल्पासाठी देखील महत्वाचे आहे त्यामुळे आपली सुचना आम्हाला मान्य आहे. |
| ७. | प्रल्हाद दळवी, दळवी ग्रामपंचायत सरपंच- अनेक कंपन्यांमध्ये अनावश्यक पद्धतीने जे बॉयलर साठी प्लास्टिक जाळले जाते आणि त्या प्लास्टिकचा धूरामुळे शेतीचा नुकसान होतो त्याबाबत उपायायोजना काय आहेत. | प्रकल्प प्रवर्तक- आमचा ॲग्रो वेस्ट बॉयलर आहे ज्या मध्ये प्लास्टिक वगैरे काही ही आमचं बॉयलर घेणार नाहीत. पर्यावरण मंत्रालयाने निकश दिलेले आहेत त्यांचा आम्ही काटेकोरपणे पालण करू. |
| ८. | श्री. सुनंदा रेड्डी, पर्यावरणप्रेमी व NGO प्रतिनिधी यांनी विचारले की उद्योग सर्व शासकीय पर्यावरण नियम व मार्गदर्शक तत्त्वांचे काटेकोर पालन करणार का? तसेच पर्यावरण संरक्षणासाठी योग्य उपाययोजना राबविल्या जाव्यात, अशा शुभेच्छांसह त्यांनी प्रकल्पाचे स्वागत केले. | प्रकल्प प्रमुखांनी आश्वासन दिले की सल्लागारांनी दिलेल्या सर्व सूचना आणि लागू असलेल्या सर्व शासकीय नियमांचे काटेकोर पालन केले जाईल. उद्योग तीन प्रमुख उद्दिष्टांवर लक्ष केंद्रित करेल – पाण्याचा जबाबदारीने वापर व व्यवस्थापन, स्थानिक समुदायाचे सक्षमीकरण, आणि पर्यावरणीय उद्दिष्टांचे पालन. |

| | | |
|---|---|---|
| ९. | श्री. योगेश गडोजे, पिंपळखेड यांनी सांगितले की प्रकल्पामुळे परिणाम होऊ नयेत म्हणून ठोस प्रतिबंधक उपाय राबविण्याची त्यांनी मागणी केली. तसेच त्यांनी सुचविले की उद्योगाने कृषी-प्रक्रिया उपक्रम सुरू करण्याचाही विचार करावा, ज्यामुळे स्थानिक शेतमालाला मूल्यवृद्धी मिळेल. | प्रकल्प प्रमुख यांनी सांगितले की मसुदा EIA अहवालामध्ये सर्व प्रदूषण नियंत्रण उपायांचा समावेश करण्यात आला आहे. उद्योग परिसरावर होणारा परिणाम कमी करण्यासाठी योग्य उपकरणे बसविण्यात येतील. उपविभागीय दंडाधिकारी तथा पविभागीय अधिकारी कळवण, उपविभाग कळवण- सामाजिक पर्यावरण जबाबदारी म्हणून एक समीती ते स्थापन करणार आहेत. प्रकल्प प्रवर्तक, ग्रामपंचायत प्रतीनिधी व जिल्हा प्रशासनाचे प्रतिनिधी यांचा सहभाग असणार आहे. आणि सदर प्रकल्पाच्या सुरूवातीस त्यांनी जी हमी दिली आहे त्याची अंमलबजावणी करते की नाही हे तुम्ही पाहू शकतात. |
| १०. | श्री. सुभाष गायकवाड, पिंपळखेड यांनी आग्रह धरला की उद्योगाने दिलेली सर्व आश्वासने ग्रामपंचायतीला लिखित स्वरूपात दिली जावीत, जेणेकरून भविष्यात गैरसोय झाल्यास गावकऱ्यांकडे अधिकृत नोंद असेल. | प्रकल्प प्रवर्तकाने सांगितले की सर्व तपशीलांसह पर्यावरणीय परिणाम मूल्यांकन अहवाल ग्रामपंचायतीकडे उपलब्ध आहे. |
| ११. | ग्रामसेविका यांनी प्रकल्पाचे स्वागत केले व सांगितले की प्रकल्पामुळे स्थानिक रोजगाराच्या मोठ्या संधी उपलब्ध होतील. परिसरात ९०% लोकसंख्या अनुसूचित जमातीची आहे. त्यामुळे महिलांसाठी कौशल्य-विकास कार्यक्रम व प्रशिक्षण द्यावे, जेणेकरून त्या औद्योगिक कार्यात सहभागी होऊ शकतील. | प्रकल्प प्रमुखांनी सांगितले की त्यांच्या सर्व सूचनांची नोंद घेण्यात आली आहे. उद्योगाच्या CER आणि CSR कार्यक्रमांतर्गत प्रशिक्षण उपक्रमांचा समावेश आधीच करण्यात आला आहे. उद्योग महिलांना रोजगारात प्राधान्य देईल. |
| १२. | श्री. निखिल संजय जाधव, पिंपळखेड यांनी विचारले की उद्योगात रोजगार मिळविण्यासाठी कोणत्या प्रकारच्या शैक्षणिक पात्रतेची आवश्यकता असेल? विद्यार्थ्यांना पूर्वीच माहिती मिळाल्यास ते त्यांच्या शिक्षणाचा अभ्यासक्रम त्यानुसार ठरवू शकतील. | प्रकल्प प्रमुखांनी सांगितले की पदवीधर, अभियंते आणि संबंधित कौशल्याधारित उमेदवारांना तांत्रिक पदांसाठी प्राधान्य दिले जाईल. तसेच, अकुशल व्यक्तींनासुद्धा आवश्यक प्रशिक्षण देऊन रोजगार उपलब्ध करून दिला जाईल. |

सदर जाहीर लोक सुनावणीचे अध्यक्ष तथा उपविभागीय दंडाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी कळवण, उपविभाग कळवण यांनी सर्वप्रथम परिसरातील उपस्थित सर्व नागरिक, कंपनीचे संचालक, कंपनीचे प्रवर्तक व

म.प्र.नि. मंडळाचे सर्व अधिकारी यांचे आभार व्यक्त केले. उपस्थित नागरिकांना अजुनही काही प्रश्न, टिका, टिप्पणी मांडायचे असतील तर ते मांडू शकता कारण सदर लोकसुनावणी ही आपल्या प्र्यावरण विषयक प्रश्नासाठी आहे असे त्यांनी सांगितले. तदनंतर नागरिकामधून कोणीही प्रश्न केला नाही. तसेच त्यांनी पूढे नमूद केले की, समितीने मांडलेल्या तांत्रीक प्रश्नांची उत्तरे प्रकल्प व्यवस्थापकाने लेखी स्वरूपात देण्यात यावीत. तसेच पूढे बोलताना त्यांनी सांगितले की, नागरीकांनी मांडलेल्या प्रश्नाची तसेच समितीकडून मांडण्यात आलेल्या तांत्रीक प्रश्नांची येथे नोंद घेण्यात आलेली आहे.

श्री. प्रशांत गायकवाड, उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, नाशिक यांनी आभार व्यक्त करताना सांगितले की, आज आपण महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे मे. बापुना स्पिरिट्स प्रा. लिमिटेड, गट नं. २६,२७,२९, ३१, ३२ (अंशतः), ३४ (अंशतः), ३५ (अंशतः), गाव. पिंपळखेड, ता. दिंडोरी, जि. नाशिक-४२२ २०२ यांचा माल्ट आधारीत प्रस्तावित ४० किलो लिटर प्रती दिन स्पिरीट उत्पादन व महुवा आधारीत २ किलो लिटर प्रती दिन स्पिरीट उत्पादन प्रकल्प उभारणीच्या बाबत पर्यावरणविषयक जाहीर लोकसुनावणी घेण्यासाठी जमलो होतो. सदर प्रकल्पाचे सविस्तर सादरीकरण प्रकल्प सल्लागार यांनी केलेले आहे. त्यानंतर आपण नागरिकांना काही प्रश्न असतील, टिका, काही सूचना, काही आक्षेप असतील ते मांडण्यासाठी संधी दिलेली होती त्याअनूषंगांने कंपनीचे प्रनिधीनी/सल्लागार यांनी नागरिकांच्या प्रश्नांचे योग्यरितीने निराकरण सूध्दा केलेले आहे या सर्व बाबींची येथे नोंद घेण्यात आलेली आहे. तसेच त्यांनी पूढे सांगितले की, सदर जाहीर लोक सुनावणीचे अध्यक्ष श्री. नरेश अकुनुरी (भा.प्र.से.), सदर जाहीर लोक सुनावणीचे सदस्य, श्री. लिंबाजी भड साहेब तसेच परिसरातील उपस्थित सर्व नागरिक, कंपनीचे संचालक यांचे आभार व्यक्त केले.

तद्नंतर अध्यक्षांनी सदर आभार मानून जाहीर लोकसूनावणी संपन्न झाल्याचे जाहीर केले.

**श्री. प्रशांत गायकवाड**
आयोजक तथा उप प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
नाशिक.

**श्री. लिंबाजी भड**
सदस्य तथा प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
नाशिक.

**श्री. नरेश अकुनुरी (भा.प्र.से.),**
अध्यक्ष तथा उपविभागीय दंडाधिकारी कळवण,
उपविभाग कळवण,
नाशिक.